# मुंबई विद्यापीठ

## परिपत्रक

**क्र.नि.वि./आय.सी.डी/२०२२-२३/२०५.**

**संदर्भ : जाहिर प्रकटन क्र. नि.वि./आय.सी.डी/२०२२-२३/२०१, दिनांक १४ ऑक्टोबर, २०२२.**

उपरोक्त संदर्भीय जाहिर प्रकटनामध्ये कलम २८(२)(त)/[28(2)(p)] अन्वये अधिसभेवर संलग्न महाविद्यालयातील/परिसंस्थातील सहा (०६) व्यवस्थापनाचे प्रतिनिधी मतदार यादीमध्ये नोंदणी करण्याबाबत नमूद केले आहे. त्यामध्ये **"ऑनलाईन अर्ज करतांना संबंधित अर्जासोबत खालील कागदपत्रे अपलोड करणे आवश्यक आहे"** या सदराखाली मुद्दा क्र. ४ मध्ये **"संस्थेच्या व्यवस्थापन प्रतिनिधीचा मतदारासाठी नामनिर्देशन केलेल्या ठरावाची प्रत (विहित नमुन्यातील)"** अपलोड करण्याबाबत नमूद केले आहे.

सदर विहित नमुन्याची प्रत या विद्यापीठाच्या निवडणूक पोर्टलवर उपलब्ध आहे. तरी संबंधितांनी विहित नमुन्याच्या प्रतीप्रमाणे संस्थेच्या लेटरहेडवर ठराव टाईप करून त्यावर संस्थेच्या अध्यक्ष व सचिव यांच्या सही व शिक्का घेण्यात यावा. तद्नंतर सदर ठराव आपल्या लॉगीनमधून अपलोड करावा.

ज्यांनी व्यवस्थापन प्रतिनिधीचे अर्ज भरून सर्टीफाईड अर्ज अपलोड केला असेल त्यांनी पुनश्च: सदर ठरावाची कॉपी अपलोड करावी, त्याकरीता त्यांना आपल्या लॉगीनमध्ये ठरावाची कॉपी पुनश्च: अपलोड करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

वरील बाबीची नोंद सर्व संबंधितांनी घ्यावी.

स्वाक्षरीत/-

(प्रा. शैलेंद्र देवळाणकर)
प्रभारी कुलसचिव तथा
निवडणूक निर्णय अधिकारी

दिनांक : १८ ऑक्टोबर, २०२२.
ठिकाण : मुंबई